# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : ८५६/२०२२

तक्रारकर्ता, श्री.मारुती मा. कदम
न्यु राहुल नगर, जय शास्त्री नगर
मुलुंड कॉलनी, मुलुंड (प) मुंबई ४०० ०८२

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक, (र.रा.प. व वन्यजीव) ठाणे
मॅरेथॉन सर्कल, लाल बहादूर शास्त्री मार्ग,
नौपाडा, ठाणे ४०० ६०२

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक, (र.रा.प. व वन्यजीव) ठाणे
मॅरेथॉन सर्कल, लाल बहादूर शास्त्री मार्ग,
नौपाडा, ठाणे ४०० ६०२

**तक्रार सुनावणीचा दिनांक : १७/६/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ६/१२/२०२१ | ---- | १७/१/२०२२ | १७/२/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.१३/१/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही" असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १७/६/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती प्रियंका हिरे, वनपरिक्षेत्र अधिकारी ठाणे वनविभाग वन्यजीव घटक ठाणे व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्रीमती गिरीजा देसाई सध्या कार्यरत- विभागीय वनाधिकारी रत्नागिरी (चिपळूण विभागीय कार्यालय) यांचे प्रतिनिधी श्री.नितीन जाधव, वरिष्ठ सांख्यीकी वनविभाग ठाणे उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" *महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.एस-३०/२००८/प्र.क्र.२८१/फ-३ दिनांक १२ डिसेंबर २०१४ सोबत जोडले आहे संदर्भान्वये आवश्यक असलेली माहिती मिळण्याबाबत व इतर माहिती*"

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.१७/२/२०२२ रोजी, "*अर्जदार यांनी विचारणा केलेली माहिती जमीन कक्ष लेखापाल यांनी ७ दिवसांत अपिलकार यांना पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (र.रा.प. व वन्यजीव) ठाणे यांना द्यावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी असे निदर्शणास आणले की, तक्रारकर्ता यांनी दि.२६/५/२०२५ रोजीच्या ईमेलव्दारे असे कळविले की, आयोगाचे सुनावणी सूचना पत्र क्र.८६६ दि.५/५/२०२५ त्यांना प्राप्त झाले. सदर विषय मुंबई विभागातील असल्याने राज्य आयोग मुंबईकडे कोंकण खंडपीठाने वर्ग केला होता, तद्नंतर मुबई खंडपीठाकडे

पारीत आदेशानुसार संबंधित विभागाने पोस्टाने माहिती पाठविली होती. ही माहिती प्राप्त झाली असल्याने आपले समाधान झाले आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात या माहितीचा शोध घेऊन ती आयोगास पुढील सुनावणीस सादर करावी.

२. तक्राकरर्ता यांना महाराष्ट्र राज्य माहिती आयोग बृहन्मुंबई खंडपीठाच्या आदेशानुसार माहिती प्राप्त झाल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तक्रारकर्तास जी माहिती प्राप्त झाली त्या माहितीची एक प्रत आयोगास उपलब्ध करून देण्याची विनंती आयोग कार्यालयाने तक्रारकर्तास ईमेलव्दारे करावी, जेणेकरून या प्रकरणात कार्यवाही करून आयोगाला निर्णय घेता येईल.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.४/८/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

(शेखर चन्द्रे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १७ जून, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव,**
उप सचिव,
महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ,
कोंकण भवन, सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४